विनामूल्य
वितरणासाठी

# कार्यशिक्षण

## इयत्ता चौथी



कार्यशिक्षण इयत्ता चौथी (मराठी माध्यम)

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

## मनोदर्पण

मनोदर्पण (८४४८४४०६३२) ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास -२११६/(प्र. क्र. ४३/१६) एसडी -४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १३.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# कार्यशिक्षण

## इयत्ता चौथी

समग्र शिक्षा



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन-अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती
२०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

## * कार्यशिक्षण समिती सदस्य *

| | |
|---|---|
| श्रीमती पल्लवी आपटे | (अध्यक्ष) |
| श्रीमती लिना तलाठी | (सदस्य) |
| श्रीमती तेजस्विनी म्हस्के | (सदस्य) |
| श्रीमती वंदना फडतरे | (सदस्य) |
| श्री. सुनिल मोरे | (सदस्य) |
| डॉ. रुपेश तांबे | (सदस्य) |
| श्रीमती गीतांजली काशिद | (सदस्य) |
| श्री. अंकित देशमुख | (निमंत्रित सदस्य) |
| श्रीमती रश्मी राजपूरकर | (निमंत्रित सदस्य) |
| श्री. विद्याधर म्हात्रे | (निमंत्रित सदस्य) |
| श्री. नंदकिशोर नगरकर | (निमंत्रित सदस्य) |
| श्रीमती दिपाली जोगदंडे | (अभ्यासक्रम समन्वयक) |
| डॉ. अजयकुमार लोळगे | (सदस्य सचिव) |

## * मुखपृष्ठ व चित्र सजावट *

श्री. लक्ष्मीकांत काळे
कु. प्राजक्ता केरकर
श्री. आदित्य पराडकर
श्रीमती प्राची पोतदार
श्री. सोहम ओतारी

संयोजक : **डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव, (वि.का.)
प्र. विशेषाधिकारी कला
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

अक्षरजुळणी : **मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे**

निर्मिती : **श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रशांत हरणे**
निर्मिती अधिकारी

कागद : ७० जीएसएम, क्रिमवोव्ह
मुद्रणादेश :
मुद्रक :

## * गुणवत्ता समीक्षक *

| | |
|---|---|
| डॉ. एम. जी. गुरव | (गुणवत्ता परीक्षक) |
| ॲड. संदेश साखरे | (विधीतज्ज्ञ) |
| डॉ. अतुल जाधव | (CWSN तज्ज्ञ) |

## * प्रकाशक *

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

**बालमित्रांनो,**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अनुसार ‘कार्यशिक्षण’ या विषयाचे इयत्ता चौथीचे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून तुम्हांला ‘कृतीतून शिकणे’ आणि ‘अनुभवातून शिकणे’ याची संधी मिळणार आहे. दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक आनंददायी व उपयुक्त गोष्टी या पुस्तकात दिल्या आहेत. घरातील व परिसरातील व्यक्ती कोणती कामे करतात, ती कशी करतात, त्यासाठी कोणती साधने वापरतात याची माहिती तुम्हांला मिळेल. तसेच तुम्हीही या कामांमध्ये सहभागी होऊन नवनवीन गोष्टी शिकणार आहात.

समाजात कसे वागावे, चांगल्या सवयी कोणत्या, सुरक्षिततेची काळजी कशी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत काय करावे याबद्दलही तुम्हांला माहिती मिळेल. विविध व्यवसाय, श्रमाचे महत्त्व आणि प्रत्येक कामाचा आदर करणे किती गरजेचे आहे हेही तुम्हांला समजेल.

पाठ्यपुस्तकात तुम्हांला अनेक रंजक उपक्रम प्रत्यक्ष करायला मिळतील जसे की, कागदकाम, मातीकाम, शिवणकाम, पाककला, चित्रकला आणि इतर छोटे-छोटे उपक्रम. या उपक्रमांमुळे तुमची कल्पकता, कौशल्य आणि आत्मविश्वास वाढेल. तसेच शेती, पिके, परसबाग आणि पर्यावरण याबद्दलही तुम्हांला माहिती मिळेल. त्यामुळे तुम्हांला निसर्गाची ओळख होईल आणि त्याचे महत्त्व समजेल. हे शिकताना तुम्ही प्रश्न विचाराल, नवीन गोष्टी करून पाहाल आणि तुमच्या मित्रांसोबत शिकण्याचा आनंद घ्याल अशी अपेक्षा आहे. तुमच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व उपक्रम आनंदाने पूर्ण करा.

पुस्तकातील आवडलेल्या आणि आणखी भर घालण्यासारख्या अपेक्षित बाबी आम्हाला अभिप्राय रूपाने कळवायला विसरू नका. चला तर मग, शिकूया, करूया आणि आनंद घेऊया!

तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

पुणे

दिनांक : १९ एप्रिल २०२६

भारतीय सौर : वैशाख शु. २, शके १९४८

**(अनुराधा ओक)**

संचालक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व

अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

# शिक्षकांसाठी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुसार ५+३+३+४ हा शैक्षणिक आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून, विद्यार्थ्यांचे वय, आवड, गरजा व विकासाच्या टप्प्यांचा विचार करून शिक्षण अधिक अनुभवाधारित, कौशल्याधारित व जीवनोपयोगी करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार पायाभूत स्तरानंतरच्या इयत्ता तिसरी ते पाचवी या स्तरावर कार्यशिक्षण हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मानला जातो, हे लक्षात घेऊन इयत्ता चौथीच्या कार्यशिक्षण पाठ्यपुस्तकाची निर्मिती प्रथमच करण्यात आली आहे.

पाठ्यपुस्तकाची रचना करताना कृती व अनुभव आधारित पद्धतीचा समावेश करण्यात आला आहे. कला, सर्जनशीलता व प्रत्यक्ष कृती यांच्या माध्यमातून बौद्धिक, भावनिक, सामाजिक व शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी 'करून शिकणे' 'अनुभवातून शिकणे' आणि 'जीवनाशी जोडलेले शिक्षण' या तत्त्वांवर आधारित उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे.

अभ्यासक्रमाचे ध्येय(अ.ध्ये.), क्षमता(क्ष.), अध्ययन निष्पत्ती(अ.नि.) व अध्ययन अनुभव यानुसार विषयाचा आशय निश्चित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील कामांचे निरीक्षण करणे, विविध साहित्यं व साधनांची ओळख करून घेणे, प्रत्यक्ष कामात सक्रिय सहभाग घेणे यासाठी प्रेरित केले जाते. घर, शाळा व परिसरातील व्यक्तींची कामे, त्यामध्ये वापरले जाणारे साहित्य व साधने, कामे सुयोग्य रीतीने पार पाडण्यासाठी आपली भूमिका या बाबी विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव करून देतात. समाजातील वर्तनाचे नियम, सकारात्मक वर्तन, सामाजिक मूल्ये व शिस्त, समाज सुरक्षितता व आपत्कालीन परिस्थितीची माहिती या घटकांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सजग नागरिकत्वाची भावना विकसित होईल, स्थानिक परिसरातील पारंपरिक व आधुनिक व्यावसायिकांशी संवाद साधून, मुलांच्या मनात विविध व्यवसायांविषयी आदरभाव, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतीविषयक मूलभूत माहिती, स्थानिक पिके, परसबाग, तसेच शेतीपूरक व्यवसाय यांचा समावेश करून विद्यार्थ्यांना पर्यावरणाशी जोडले आहे. यामुळे निसर्गाविषयी प्रेम, जाणीव व संवर्धनाची भावना विकसित होते. तसेच उत्पादक कार्यात सहभाग घेण्याची सवय लागते. पाठ्यपुस्तकात विविध कौशल्यांची ओळख करून देण्यात आली आहे. हस्तकौशल्य, शिवणकाम, कागदकाम, मातीकाम, पाककला, संभाषण कौशल्य, तांत्रिक कौशल्य तसेच कृती आधारित उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व उपक्रम सर्जनशीलतेला चालना देणारे, स्वावलंबन विकसित करणारे व कार्यक्षमतेत वाढ करणारे आहेत. उपक्रम राबवताना विद्यार्थ्यांचा वयोगट, स्थानिक परिस्थिती, उपलब्ध साधने व विद्यार्थ्यांची वैयक्तिक गती यांचा विचार करून कल्पकतेचा व नावीन्यपूर्णतेचा वापर करणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकात दिलेले उपक्रम नमुन्यादाखल दिले असून, त्यामध्ये आवश्यक ते बदल, रूपांतर किंवा विस्तार करण्यास हरकत नाही तथापि, अभ्यासक्रमातील सर्व घटकांचे अध्यापन प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. प्रत्येक घटकाखाली शिक्षकसूचना दिल्या आहेत.

कार्यशिक्षण विषयासाठी शासनाने निर्धारित केलेल्या तासिकांनुसार उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे. या विषयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन पारंपरिक पद्धतीऐवजी कृती आधारित व निरीक्षणाधारित असणे आवश्यक आहे. विविध मूल्यांकन निकष वापरून, उपक्रम, सादरीकरण, सहभाग, सर्जनशीलता व कौशल्य या बाबींचा विचार करून सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे अपेक्षित आहे.

**"विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (Sign Language) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतींने व्यक्त होण्याची संधी द्यावी."**

राज्यातील अनेक शिक्षक कार्यशिक्षण विषयाचे अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. अशा उपक्रमांची माहिती, अनुभव व छायाचित्रे पाठ्यपुस्तक मंडळाकडे पाठवावीत, ही अपेक्षा आहे. आपल्या कल्पना व उपक्रमांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात येईल.

२१व्या शतकातील विद्यार्थी सक्षम, सर्जनशील, कौशल्यसंपन्न व जबाबदार नागरिक घडावा, तसेच त्याच्यामध्ये आत्मनिर्भरता, समस्या सोडवण्याची क्षमता व सामाजिक जाणीव विकसित व्हावी, या उद्देशाने या पाठ्यपुस्तकाद्वारे एक महत्त्वपूर्ण व सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. या प्रयत्नाचे शिक्षक, पालक व समाज स्वागतच करतील, हीच अपेक्षा.

**कार्यशिक्षण (विषय समिती)**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

# कार्यशिक्षण पूर्वतयारी स्तर (इयत्ता चौथी)

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-1 : दैनंदिन कामांविषयी माहिती घेणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-1.1 : घरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामांविषयी माहिती सांगणे. | **घटक :** कामे व साधने |
| **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती (LOs)** |
| १) दैनंदिन कामांचे वर्णन. | १) घरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामांचे निरीक्षण करतो. |
| २) दैनंदिन कामांसाठी लागणारी साधने व साहित्ये. | २) दैनंदिन कामांसाठी लागणारी साधने व साहित्ये याची यादी तयार करतो. |
| ३) कामांनुसार साधनांचे वर्गीकरण. | ३) कामांनुसार साधने व साहित्ये यांचे वर्गीकरण करतो. |
| ४) कामातील माझा सहभाग. | ४) दैनंदिन कामांत सहभाग घेतो. |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-1. 2. : परिसरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामाविषयी माहिती सांगणे. | **घटक :** परिसरातील कामांची ओळख. |
| १) कामे व साहित्ये. | ५) परिसरातील व्यक्तींच्या कामांची माहिती सांगतो. |
| २) परिसरातील व्यक्तींच्या कामांसाठी लागणारी साहित्ये. | ६) परिसरातील व्यक्तींच्या कामांसाठी लागणाऱ्या साधने व साहित्यांची माहिती सांगतो. |
| ३) सार्वजनिक कामांतील सहभाग. | ७) परिसरातील कामे सुरळीत चालण्यासाठी आपली भूमिका स्वत:च्या शब्दांत सांगतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-2 : सामाजिक जीवन जगताना सकारात्मक वर्तन करणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-2. 1. : घरात व समाजात वावरताना सकारात्मक वर्तन करणे. | **घटक :** समाज |
| **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती (LOs)** |
| १) समाज वर्तन | ८) समाजातील वर्तनाचे नियम समजून घेतो. |
| २) समाज वर्तनाचे सकारात्मक नियम. | ९) समाज वर्तनाचे सकारात्मक नियमाप्रमाणे वर्तन करतो. |
| ३) समाज सुरक्षितता नियम. | १०) समाज सुरक्षिततेच्या नियमांची माहिती घेतो. |
| ४) आपत्कालीन परिस्थिती | ११) आपत्कालीन परिस्थितीबद्दल माहिती सांगतो. |
| ५) आपत्कालीन परिस्थितीत सकारात्मक विचार. | १२) सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने आपत्कालीन परिस्थितीत सकारात्मक वर्तन करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-3 : विविध व्यावसायिक/कारागीर यांच्या कामासंबंधी उत्सुकता व स्वारस्य दाखवणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-3.1 : परिसरातील व्यवसाय व व्यावसायिक यांच्या कामांविषयी माहिती घेणे. | **घटक :** परिसर व व्यवसाय. |
| १) आपला परिसर. | १३) परिसरातील व्यवसायांची माहिती मिळवतो. |
| २) परिसरातील व्यवसायांचे वर्गीकरण. | १४) पारंपरिक व आधुनिक व्यवसायांची माहिती घेऊन वर्गीकरण करतो. |
| ३) परिसरातील व्यावसायिकांची माहिती. | १५) परिसरातील विविध व्यावसायिकांचे वर्गीकरण करतो. |
| ४) परिसरातील व्यावसायिकांशी संवाद. | १६) परिसरातील व्यावसायिकांशी संवाद साधतो. |
| ५) श्रमप्रतिष्ठा | १७) श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व समजून घेतो. |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-3.2 : परिसरातील सजीव आधारित उत्पादक कार्याबाबत जाणून घेणे. | **घटक :** परिसरातील पिके |
| १) स्थानिक पिके | १८) स्थानिक परिसरातील पीक उत्पादनांची माहिती सांगतो. |
| २) परसबाग | १९) परसबागांविषयी माहिती सांगतो व उत्पादक कार्यात सहभाग नोंदवतो. |
| ३) शेतीपूरक व्यवसाय | २०) शेतीपूरक व्यवसायांचे वर्गीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-4 : विविध कौशल्यांचा विकास करणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-4.1 : हस्तकौशल्य, संभाषण कौशल्य व तांत्रिक कौशल्ये विकसित करणे. | **घटक :** कौशल्यांची ओळख व विकास. |
| १) हस्तकौशल्य विकास | २१) दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती सांगतो. |
| २) संभाषण कौशल्य विकास | २२) दैनंदिन जीवनात संभाषण कौशल्ये सफाईदारपणे वापरतो. |
| ३) तांत्रिक कौशल्ये विकास | २३) अवगत असलेल्या तांत्रिक कौशल्यांचा अचूक वापर करतो. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | दैनंदिन कामे | १ |
| २. | दैनंदिन कामांसाठी लागणारी साहित्य व साधने | २ |
| ३. | कामातील माझा सहभाग | ६ |
| ४. | हस्तकौशल्य | ८ |
| ५. | परिसरातील कामांची ओळख | १० |
| ६. | कामे व साहित्य | ११ |
| ७. | हस्तकौशल्य | १६ |
| ८. | माझी परसबाग | १७ |
| ९. | आपली पिके | २१ |
| १०. | परिसर स्वच्छ करूया | २५ |
| ११. | हस्तकौशल्य | २६ |
| १२. | समाजवर्तन | २८ |
| १३. | सार्वजनिक कामातील सहभाग | ३० |
| १४. | समाज वर्तनाचे सकारात्मक नियम | ३३ |
| १५. | सामाजिक सुरक्षितता | ३४ |
| १६. | हस्तकौशल्य | ३६ |
| १७. | आपत्कालीन परिस्थिती | ३८ |
| १८. | परिसर व व्यवसाय | ४१ |
| १९. | हस्तकौशल्य | ४५ |
| २०. | परिसरातील व्यावसायिकांची माहिती | ४६ |
| २१. | पानाफुलांचे तोरण | ४८ |
| २२. | शेतीपूरक व्यवसाय | ४९ |
| २३. | आधुनिक व्यवसाय | ५२ |
| २४. | करू मैत्री संगणकाशी | ५३ |
| २५. | खरेदी–विक्री | ५६ |
| २६. | संभाषण कौशल्य | ६० |
| २७. | हस्तकौशल्य | ६१ |




**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# १ दैनंदिन कामे

घरात आपल्याला सुरक्षित व आरामदायक वाटते. घरातील कामे सुरळीत होण्यासाठी कामांत मदत करणे हे कुटुंबातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या मदतीमुळे कामे लवकर व सुरळीत होतात. एकाच व्यक्तीवर कामाचा ताण पडत नाही. कुटुंबातील वातावरण आनंदी राहते. आपले नातेवाईक कोणती कामे करतात हे समजून घेऊ.

## माझी कृती

**१. खालील व्यक्ती कोणती कामे करतात ते लिही.**

**१) काका :** ____________________

**२) काकू :** ____________________

**३) मामा :** ____________________

**४) मामी :** ____________________

**५) आत्या :** ____________________

**६) मावशी :** ____________________

- मुलांनी नोंद केलेल्या कामांबाबत चर्चा/गप्पागोष्टी कराव्यात व कामाचे महत्त्व सांगावे.
- घरातील व्यक्ती व त्यांची कामे यांचे नाट्यीकरण करून घ्यावे.

अ. ध्ये. १
क्ष. १.१
अ. नि. १

# २ दैनंदिन कामांसाठी लागणारी साहित्य व साधने

दैनंदिन जीवनात आपण अनेक कामे करतो. या कामांसाठी विविध साहित्य व साधनांचा आपण वापर करतो. या साधनांमुळे कामे लवकर व सुरळीत होतात. अशा काही साधनांची माहिती घेऊया.

## माझी कृती

**१. दैनंदिन कामांचे निरीक्षण करून त्यासाठी लागणाऱ्या साहित्य व साधनांची यादी तयार कर.**

______________________________

______________________________

______________________________

**२. तयार केलेल्या साहित्य व साधनांच्या यादीतील वस्तूंचे कामानुसार वर्गीकरण कर.**

| साफसफाई | बागकाम | स्वयंपाक | इतर |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**३. खाली दिलेल्या कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनाचे नाव लिही.**

१) दूध तापवण्यास – ____________

२) जेवणाचे सर्व पदार्थ एकत्रित वाढण्यास – ____________

३) अंगण झाडण्यास – ____________

४) खड्डा खणण्यास – ____________

५) धान्य पाखडण्यास – ____________

६) केर कचरा भरून टाकण्यास – ____________

७) चहा गाळण्यास – ____________

८) खाद्यपदार्थ साठवण्यास – ____________

- विद्यार्थ्यांना साहित्ये व साधनांची ओळख करून द्यावी.
- घरातील तसेच शेतीतील साहित्य व साधनांच्या वापराबाबत चर्चा करावी.

अ. ध्ये. १
क्ष. १.१
अ. नि. २

## ४. योग्य जोडी जुळव.

• साधने व त्यांचा उपयोग























- घरातील विविध उपकरणांची माहिती देऊन त्यांचा उपयोग सांगावा.
- विशिष्ट कामांसाठी विशिष्ट साधने लागतात. हे चर्चेतून सांगावे.

अ. ध्ये. १
क्ष. १.१
अ. नि. ३

## ५. चित्र पूर्ण कर.


















६. दिलेल्या कोड्यातून दैनंदिन कामांसाठी लागणाऱ्या साहित्य व साधनांची नावे शोध व गोल कर.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उ | ल | थ | णे | झा | रा | रा |
| पो | ळी | डा | टो | चि | डू | ख |
| प | कु | व | त | प | म | रा |
| पो | द | कु | स | वा | ली | य |
| वा | ळ | कु | क | र | ल | वा |
| वि | सु | पा | सु | सां | ड | शी |
| ळी | री | न | ट | बा | द | ली |

७. तुझ्या वहीत घरातील दैनंदिन कामांसाठी लागणाऱ्या साधन–साहित्यांची चित्रे चिकटव व चित्राखाली त्यांचे नाव व उपयोग लिही.

# ३ कामातील माझा सहभाग

घरातील लहान-सहान कामे करून आपण मोठ्यांना घर कामात मदत करू शकतो. यामुळे कामे कशी करावी याबद्दल आपल्याला अनुभव मिळतो. घरातील कामे करण्याची सवय लागते व आपण स्वावलंबी होतो.

## माझी कृती

**१. खालील प्रश्नांची उत्तरे तुझ्या शब्दांत लिही.**

- सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तुझ्या घरात कोणती कामे केली जातात?

______________________________

______________________________

______________________________

- आई-बाबांना काम करताना पाहून तुला त्यांना कोणत्या कामात मदत करावीशी वाटते?

______________________________

______________________________

______________________________

- घरातील कोणत्या कामात तू मदत करतोस/करतेस?

______________________________

______________________________

______________________________

**२. घरच्यांना मदत होईल, अशी कोणती कामे तू करतोस/करतेस त्यासमोरील चौकोनात ✔ अशी खूण कर.**

१. शाळेत जाण्यासाठी स्वत:ची तयारी स्वत: करणे. ☐
(गणवेश घालणे, केस विंचरणे, इत्यादी)

२. बाजारातून आणलेली भाजी वेगळी करणे. ☐

३. झाडांना पाणी घालणे. ☐

४. सामानाच्या पिशव्या उचलण्यास मदत करणे. ☐

५. अंथरूण-पांघरुणाची घडी करणे. ☐

६. पाहुण्यांना पाणी देणे. ☐

- कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते हे विद्यार्थ्यांना सांगावे.
- विविध कामांची यादी करून त्या कामात मदत केल्यास काम कसे सुसह्य होते त्याचे महत्त्व सांगावे.

## ३. तयार करूया मदतीचा हात

**साहित्य :** कागद/कार्डशीट, स्केचपेन/तेलखडू, रंग, पेन्सिल, इत्यादी.

**कृती :** कागदावर हाताच्या पंजाचा आकार काढून प्रत्येक बोटावर तुझ्या आवडीच्या कामाचे नाव लिही.

## ४. नवीन काम शिकूया

- रोप लावण्यासाठी कुंडीत माती भर व रोप लाव.
- घरातील कचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण कर.

## ५. खालील प्रश्नांची उत्तरे तुझ्या शब्दात लिही.

- इतर कोणती नवीन कामे तू शिकला/शिकली आहेस?

- घर स्वच्छ व व्यवस्थित राहण्यासाठी तू काय करशील?

- विद्यार्थ्यांनी तयार केलेले मदतीचे हात वर्गातील भिंतीवर लावावे.
- विद्यार्थ्यांने केलेल्या कामाची किंवा मदतीची नोंद वहीत करून घ्यावी.
- वरील कृतीपत्रिका सोडवून घेऊन त्यांच्याशी घरकामातील मदतीबाबत गप्पागोष्टी कराव्यात.

अ. ध्ये. १
क्ष. १.१
अ. नि. ४

# ४ हस्तकौशल्य

आपल्या देशात अनेक सणसमारंभात रांगोळी काढली जाते. रांगोळी हा एक सुंदर व आनंददायी हस्तकौशल्याचा प्रकार आहे.

## माझी कृती

### १. रांगोळी

**खालील साहित्य व साधनांचा वापर करून दिलेल्या चित्रांच्या कृतिक्रमानुसार रांगोळी काढ.**

**साहित्य व साधने :** रांगोळी (रंग आवडीप्रमाणे) खडू, मोजपट्टी, हात पुसण्यासाठी कापड. इत्यादी.




- विविध रांगोळ्या काढण्याचा सराव करून घ्यावा.
- रांगोळीचे प्रदर्शन भरवावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१.२

## २. भेटकार्ड

**खालील साहित्य व साधनांचा वापर करून दिलेल्या चित्रांच्या कृतिक्रमानुसार भेटकार्ड तयार कर.**

**साहित्य व साधने :** रंगीत कागद, कात्री, पेन्सिल, डिंक, मोठा पांढरा कागद, कुंदन, टिकल्या, स्केचपेन, इत्यादी.



























## ५ परिसरातील कामांची ओळख

आपले दैनंदिन जीवन सुरळीत होण्यासाठी परिसरातील अनेक व्यक्ती वेगवेगळी कामे करत असतात. या कामांमुळे आपले जीवन सोपे होते. चला या विविध कामांची ओळख करून घेऊ.

### माझी कृती

**सांगा पाहू मी काय काम करतो ?**




















- दिलेल्या चित्रांवर गप्पागोष्टी करून विविध कामांचे उपयोग सांगावे.

अ. ध्ये. १

क्ष. १.२

अ. नि. ५

# ६ कामे व साहित्य

प्रत्येक कामासाठी ठरावीक साहित्य व साधनांची आवश्यकता असते. या साहित्यांमुळे काम सोपे होते आणि नीट करता येते. साहित्य व साधनांच्या वापराने वेळ व श्रम वाचतात. त्यामुळे विविध कामांसाठी लागणाऱ्या साहित्यांची ओळख असणे आवश्यक आहे.

## माझी कृती

**१. खाली बँक-कॅशिअर, प्लंबर, वडापाव विक्रेता, वीजतंत्री, संगणक अभियंता आणि चित्रकार यांची चित्रे दिली आहेत. त्यांच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या साधनांची नावे चित्राखाली लिही.**




______________________
______________________
______________________
______________________



______________________
______________________
______________________
______________________



______________________
______________________
______________________
______________________



______________________
______________________
______________________
______________________



______________________
______________________
______________________
______________________



______________________
______________________
______________________
______________________

- विशिष्ट कामांसाठी विशिष्ट साहित्य व साधनांची आवश्यकता असते. काम करण्यासाठी ते साहित्य व साधन वापरता आले पाहिजे हे सांगावे.

## २. खाली दिलेल्या कामांसाठी लागणाऱ्या साहित्य व साधनांची यादी तयार कर.

**शिवणकाम :** ........................................

........................................

**शेतीकाम :** ........................................

........................................

**स्वच्छतेचे काम :** ........................................

........................................

## ३. परिसरातील एखाद्या व्यावसायिकाची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार कर.

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

........................................

- परिसरातील व्यावसायिकाची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करून घ्यावी. व्यावसायिकाची मुलाखत घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. (हा उपक्रम घेणे अनिवार्य आहे.)
- नमुना मुद्दे : १. व्यावसायिकाचे नाव, २. त्यांचे काम, ३. कामाचे स्वरूप-वेळ, ४) उत्पन्न.

अ. ध्ये. १

क्ष. १.२

अ. नि. ६

**४. आपल्या सभोवती असणाऱ्या काही व्यावसायिकांची व ते वापरत असलेल्या साधनांची चित्रे खाली दिलेली आहेत. या साधनांचा त्यांना कसा उपयोग होतो हे सांगण्यासाठी तक्ता पूर्ण कर.**

| काम | साधने | साधनांचा उपयोग |
|---|---|---|
|  | स्टेथोस्कोप  | |
|  | शिलाई मशीन, मोजपट्टी  | |
|  | सुई/ फुले / धागा  | |
|  | वजनकाटा  | |

| | | |
|---|---|---|
|  | खराटा  | |
|   | खडू, डस्टर  | |
|  | ट्रॅक्टर  | |
|  | पाना आणि स्क्रू-ड्रायव्हर  | |

अ. ध्ये. १

क्ष. १.२

अ. नि. ६

- व्यक्तींच्या कामांसाठी लागणाऱ्या विविध साहित्य व साधनांचे उपयोग आणि महत्त्व सांगावे.

## वाहन दुरुस्तीसाठी लागणारी साधने व साहित्य

**आपण वाहतुकीसाठी विविध वाहनांचा उपयोग करतो. उदा. बस, कार, सायकल, मोटर सायकल, रिक्षा इत्यादी. ही वाहने नादुरुस्त झाल्यास वाहन दुरुस्ती व देखभाल करणारा मेकॅनिक वाहनाच्या दुरुस्तीसाठी खालील साहित्य व साधनांचा वापर करतो.**



**१. पाना :** नट बोल्ट घट्ट व सैल करणे.



**२. स्क्रू ड्रायव्हर :** स्क्रू घट्ट व सैल करणे.



**३. जॅक :** वाहन वर उचलणे.



**४. हवा भरण्याचे यंत्र :** चाकात हवा भरणे.



**५. पक्कड :** वस्तू घट्ट धरणे.



**६. नट–बोल्ट :** दोन भाग जोडणे.



**७. टायर ट्यूब :** वाहन सुरळीतपणे धावण्यासाठी.



**८. कापड :** वाहन पुसणे/स्वच्छ करणे.

**५. परिसरातील वाहन दुरुस्ती व देखभाल केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील साधन व साहित्यांचा वापर कसा केला जातो त्याचे निरीक्षण कर.**

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ६

- परिसरातील वाहन दुरुस्ती व देखभाल केंद्र भेटीचे आयोजन करावे. (हा उपक्रम घेणे अनिवार्य आहे.)

# ७ हस्तकौशल्य

आपण काही उत्सवांना घर सुशोभित करतो त्यासाठी कागदी फुलांची व सजावट केलेला आकाशकंदील वापरतो. आकाशकंदील करून विकले की अर्थार्जनही होऊ शकते.

## माझी कृती

### आकाशकंदील

**साहित्य व साधने :** २ रंगाचे घोटीव कागद, कार्डशीट, पट्टी, पेन्सिल, कात्री, डिंक, दोरा, सोनेरी कागद किंवा टेप इत्यादी.

दिलेल्या क्रमाने कृती करून आकाशकंदील तयार कर.




- दिलेल्या कृतिक्रमाप्रमाणे आकाशकंदील तयार करून घ्यावा.

# ८ माझी परसबाग

आपल्या घराच्या किंवा शाळेच्या परिसरात, इमारती सभोवतालच्या उपलब्ध जागेत परसबाग लावली जाते. परसबागेतून आपल्याला फळे, फुले आणि औषधी वनस्पती मिळतात.

## माझी कृती

### १. परसबागेला भेट दे व खालील घटकांबाबत निरीक्षण करून चर्चा कर.

**✻ परसबाग कशी असावी :**

- परसबागेसाठी जमीन लागवडी योग्य, भरपूर सूर्यप्रकाश येईल अशी असावी.
- उपलब्ध जागेनुसार लागवड करावी.
- पाणी पुरवठा करता येईल अशी सोय असावी.
- जनावरांपासून सुरक्षा करण्यासाठी परसबागेला कुंपण असावे.

**✻ परसबागेसाठी आवश्यक साहित्य व साधने :**

छोट्या बादल्या, कुंड्या, खुरपे, झारी, माती, खत, बी किंवा रोपे इत्यादी.

**✻ परसबागेची लागवड प्रक्रिया :**

- **माती तयार करणे :** मातीतील दगड गोटे काढून ती भुसभुशीत करून तयार करावी.
- **खत घालणे :** वाफा तयार करताना मातीत खत मिसळावे.

  **खतांचे प्रकार–** १. कंपोस्ट खत २. शेणखत ३.गांडुळ खत ४. हिरवळीचे खत
- **बी पेरणे :** योग्य अंतरावर बियांची किंवा रोपांची लागवड करावी. गरज असल्यास बियांवरून मातीचा पातळ थर पसरावा.
- **पाणी देणे :** गरजेनुसार झारीने हळुवार पाणी द्यावे. खूप पाणी साचू देऊ नये.
- **देखभाल :** केलेल्या लागवडीकडे नियमित लक्ष द्यावे. वाढलेले तण व नको असलेल्या वनस्पती काढून टाकाव्या.



- एखाद्या परसबागेला भेट देऊन माहिती सांगावी. (हा उपक्रम अनिवार्य आहे)
- परसबागेत कोणकोणती रोपे, भाज्या, वेली लावतात याची यादी करून घ्यावी.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.२
अ. नि. १९

२. तू पाहिलेल्या परसबागेत कोणकोणत्या रोपांची लागवड केली आहे. त्याची यादी तयार कर.

| | | |
|---|---|---|
| १. .................................... | २. .................................... | ३. .................................... |
| ४. .................................... | ५. .................................... | ६. .................................... |

३. घराच्या किंवा शाळेच्या आवारात कुंडीमध्ये मेथी, कोथिंबीर, टोमॅटो, मिरची यांसारखी लवकर येणाऱ्या भाज्यांची लागवड कर.

### ४. फळांची कोशिंबीर

परसबागेत विविध फळझाडेसुद्‌धा लावतात. या फळझाडांपासून मिळणाऱ्या फळांची चविष्ट व पौष्टिक कोशिंबीर तयार करता येते.

खाली दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून चित्रातील क्रमाने शिक्षकांच्या सूचनेनुसार कृती कर.

**साहित्य व साधने–** चिकू, केळी, कलिंगड, संत्री, मोसंबी, द्राक्ष, सफरचंद, पेर, उपलब्धतेनुसार फळे, चाट मसाला, वाडगा, सुरी , साल काढण्याचे यंत्र, चमचा आणि वाट्या इत्यादी.




फळे स्वच्छ धुऊन घे.




आवश्यक फळांची साल काढून टाक.




फळांच्या लहान लहान फोडी कर.




सर्व फोडी मोठ्या भांड्यात एकत्र कर.




फोडींवर चाट मसाला घाल.




चाट मसाला घालून सर्व फोडी एकत्र कर.




तयार झालेली पौष्टिक व चविष्ट कोशिंबीर वाटीत काढून इतरांना दे व स्वत:ही खा.

- परसबाग कशी तयार करायची हे समजावून सांगावे. परसबाग तयार करून घ्यावी.
- फळांची कोशिंबीर तयार करण्यासाठी परसबागेतील फळांचा वापर करावा किंवा विद्यार्थ्यांना उपलब्धतेनुसार घरून फळे आणण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांच्या सहभागाने फळांची कोशिंबीर तयार करून घ्यावी.

## परसबागेची निगा व सुशोभन

परसबागेतील झाडांचे रक्षण करण्यासाठी कुंपण असणे आवश्यक आहे. हे कुंपण आकर्षक केल्यास परसबाग अधिक सुशोभित होऊ शकते. परसबागेला कुंपण तयार करण्यासाठी रिकाम्या प्लास्टिक बाटल्यांचा सुद्धा उपयोग करता येतो. त्यामुळे परिसरातील टाकाऊ प्लॅस्टिक बाटल्यांचा पुनर्वापर करता येऊ शकतो.

### माझी कृती

**१. खाली दिलेल्या साहित्यांचा व साधनांचा उपयोग करून दिलेल्या क्रमाने कृती कर.**

**साहित्य व साधने :** प्लास्टिकच्या टाकाऊ बाटल्या, माती, जलरंग, खुरपे, पाणी, इत्यादी.

१. प्रथम प्लास्टिकच्या बाटल्या स्वच्छ करून त्यांना वेगवेगळे रंग दे.

२. बाटल्यांचा रंग सुकल्यावर पूर्ण बाटली मातीने भरून झाकण लाव.

३. शाळेच्या आवारात परसबागेच्या कडेला आवश्यक त्या ठिकाणी खुरप्याच्या मदतीने माती खोदून घे.

४. त्यामध्ये रंगीत बाटल्या (बाटलीचे तोंड खाली ठेवून) उभ्या ठेव. खणलेली माती बाटलीभोवती सरकवून बाटली घट्ट उभी कर.

५. बाटलीच्या तळाशी असलेली माती घट्ट पकडून राहण्यासाठी वरून थोडे पाणी शिंपडून हाताने माती घट्ट दाब.






२. रिकाम्या खोक्यावर किंवा कपावर, सुतळी किंवा आइस्क्रीमच्या काड्या चिकटवून पेन स्टँड तयार कर.



अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१.२

• टाकाऊ वस्तूपासून बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवावे.

# ९ आपली पिके

**शिक्षिका:** सांगा बरं, आज तुम्ही डब्यात काय काय आणलंय?

**समीर:** मी आज बाजरीची भाकरी आणि मेथीची भाजी आणली आहे.

**सई:** मी तर आज वरण-भात आणि बटाट्याची भाजी आणली आहे.

**शिक्षिका:** वा छान ! पण समीर, तुला माहीत आहे का, तुझ्या डब्यातली ही 'बाजरी' आणि 'मेथी' नेमकी येते कुठून?

**समीर:** (विचार करत...) आई तर दुकानातून आणते, पण बाबा म्हणतात ती शेतात तयार होते.

**शिक्षिका:** अगदी बरोबर ! आपल्या परिसरात शेतकरी दादा कष्ट करून पिके घेतात. रोहन, तुझ्या घराच्या मागे जे शेत आहे, तिथे सध्या कोणते पीक लावलंय?

**रोहन:** बाई, तिथे आता 'ज्वारी' कापणीला आली आहे आणि बाजूच्या वाफ्यात थोडा 'हरभरा' सुद्धा लावलाय.

**शिक्षिका:** छान ! ज्वारी, बाजरी, तांदूळ, हरभरा, तूर, कापूस, ऊस अशी अनेक आपल्याकडची स्थानिक पिके आहेत.

**सई:** बाई, मग आपल्याला भाज्या व फळे कुठून मिळतात?

**समीर:** आणि बाई, फुले पण?

**शिक्षिका:** जशी धान्ये, ऊस, कापूस यांची शेती केली जाते, तशा भाज्या, फळे व फुले यांच्या मोठ्या बागा असतात तेथून आपल्याला या गोष्टी मिळतात.
चला कोणत्या ठिकाणचे कोणते पिक प्रसिद्ध आहे ते आपण गाण्यातून समजून घेऊ या. गाण्यात तुमच्या स्थानिक पिकांचा उल्लेख नक्की करा.



## माझी कृती

**१. शिक्षकांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शेताला भेट देऊन शेतकऱ्याची मुलाखत घे.**

## २. समूह गीत

| | |
|---|---|
| गाडी आली गाडी आली | चला चला रे । |
| गाडी थांबली गाडी थांबली | चढा चढा रे ॥ |
| गाडी आली **सांगलीहून** | **हळद** आणली भरून भरून |
| हळद उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **जळगावहून** | **केळी** आणली भरून भरून |
| **केळी** उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **भिवापूरहून** | **मिरची** आणली भरून भरून |
| मिरची उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **जालन्याहून** | **ज्वारी** आणली भरून भरून |
| ज्वारी उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **नाशिकहून** | **द्राक्षे** आणली भरून भरून |
| द्राक्षे उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **रत्नागिरीहून** | **हापूस आंबा** आणला भरून भरून |
| हापूस आंबा उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **घोलवडहून** | **चिकू** आणले भरून भरून |
| चिकू उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **साताऱ्याहून** | **लसूण** आणला भरून भरून |
| लसूण उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **सोलापूरहून** | **तूर** आणली भरून भरून |
| तूर उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |
| गाडी आली **लातूरहून** | **हरभरे** आणले भरून भरून |
| हरभरे उतरवून घ्या रे | चला चला रे ॥ |

- वरील गाणे ताला-सुरात म्हणून घ्यावे.
- स्थानिक परिसरातील पिकांचा उल्लेख करून गाणे समूहात म्हणून घ्यावे.
- अन्नधान्याचे महत्त्व आणि शेतकऱ्याचे कष्ट यांची जाणीव करून द्यावी.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.२
अ. नि. १८

### ३. खालील तक्ता पूर्ण कर.

| अन्नधान्ये | कडधान्ये | फळे | पालेभाज्या | फळभाज्या | फुले |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

### ४. पिकांची चित्रे पहा आणि नावे लिही.






.................................... .................................... .................................... ....................................






.................................... .................................... .................................... ....................................






.................................... .................................... .................................... ....................................

**५. विविध प्रकारची धान्ये/बिया यांचे नमुने छोट्या पारदर्शक पिशव्यांमध्ये जमव. कार्डशीटवर झाडाचे चित्र काढून त्यावर जमवलेले नमुने चिकटव.**

### ६. क्षेत्रभेट

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तुझ्या परिसरातील एखाद्या शेताला किंवा फळबागेला भेट दे. खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती घे व नोंद कर.

१. शेतकऱ्याचे नाव– (ज्यांच्या बागेला भेट दिली, त्यांचे नाव)

_______________

२. ठिकाण / गाव–

_______________

३. दिनांक, वेळ–

_______________

४. कोणकोणती झाडे/पिके आहेत?

_______________

५. लागवडीपासून उत्पादन मिळेपर्यंत साधारण किती कालावधी लागतो?

_______________

६. झाडांना पाणी कोठून दिले जाते? (विहीर/नदी/तलाव)

_______________

७. पाणी देण्याची पद्धत कोणती? (ठिबक सिंचन/ तुषार सिंचन/पाट पद्धती)

_______________

८. शेतीसाठी कोणते खत वापरले जाते? (शेणखत /गांडुळखत/ कंपोस्ट/हिरवळीचे)

_______________

९. झाडांना रोगांपासून वाचवण्यासाठी काय उपाय करतात?

_______________

१०. तेथे कोणती यंत्रे किंवा अवजारे दिसली?

_______________

११. शेतकऱ्याशी चर्चा करून त्यांना आलेल्या अडचणी व अनुभव लिही.

_______________

- क्षेत्रभेटीचे आयोजन करावे (हा उपक्रम अनिवार्य आहे.)

# १० परिसर स्वच्छ करूया

आपल्या सभोवताली प्रत्येक व्यावसायिक कोणते तरी काम करत असतो. उदा. शेतकरी शेती करतात, डॉक्टर रुग्णाला तपासतात, स्वच्छता कर्मचारी परिसराची स्वच्छता करतात इत्यादी. ही सर्व कामे महत्त्वाची आहेत. या सर्व कामांबद्दल आपण आदर बाळगायला हवा.



## माझी कृती

**१) तुझ्या परिसराची स्वच्छता कर व खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

- स्वच्छता केली नाही तर काय होईल?

- स्वच्छता करणाऱ्या व्यक्तीचा आदर कसा करशील?

- आपल्याला मदत करणाऱ्या लोकांची यादी कर.

**२. तुझ्या घरात किंवा शाळेत काम करणाऱ्या मावशींच्या किंवा काकांच्या वाढदिवसाला कागदांपासून फुले व वर्तमानपत्रापासून फुलदाणी तयार कर व त्यांना भेट दे.**

- विद्यार्थ्यांकडून परिसर स्वच्छता करून घ्यावी.
- श्रमप्रतिष्ठेच्या कथा सांगाव्या.
- विविध दिनविशेष साजरे करताना मदतनिसांना बोलावून त्यांचा सत्कार करावा.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १७

आपल्या घरी उपलब्ध असलेल्या वस्तूंपासून आपण आकर्षक वस्तू तयार करू शकतो. या वस्तूंचा वापर इतरांना भेट देण्यासाठी करू शकतो.

### माझी कृती

### १. फुलदाणी

खाली दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून दिलेल्या चित्रांच्या कृतिक्रमानुसार फुलदाणी तयार कर.

**साहित्य व साधने :** जुनी वर्तमानपत्रे, ताटली, प्लास्टिक बाटली. फेविकॉल, डिंक, जलरंग, ब्रश, पाणी इत्यादी.



१) एक प्लास्टिकची बाटली घे. वर्तमान पत्राच्या कागदांचे तुकडे करून घे.



२) भांड्यात पाणी घेऊन त्यात डिंक/फेविकॉल घालून विरघळवून घे.



३) कागदाचा एकएक तुकडा त्या पाण्यात भिजवून बाटलीवर लाव.





४) बाटली पूर्ण झाकली जाईल असे कागद चिकटवून घे.



५.बाटली सुकू दे.



६) सुकलेल्या बाटलीच्या आकाराला आवडता रंग दे.



७) रंग वाळल्यावर टिकल्या, मणी, काचा चिकटव व छानशी फुलदाणी तयार कर.

• तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवावे. विक्री करून घ्यावी.

## २. पुष्पगुच्छ

खाली दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून दिलेल्या चित्रांच्या कृतिक्रमानुसार पुष्पगुच्छ तयार कर.

**साहित्य व साधने :** पातळ कार्डशीट (पानांसाठी हिरवा व फुलांसाठी रंगीबेरंगी कार्डशीट), डिंक, स्केचपेन, मणी, कुंदन, टिकल्या इत्यादी.




























# १२ समाजवर्तन

आपण एकत्र येऊन अनेक कार्यक्रम साजरे करतो. त्यामुळे एकमेकांच्या भेटीगाठी होतात, नव्याने ओळखी होतात. वातावरण आनंदी होते. नवीन माहिती मिळते. नवीन गोष्टी शिकता येतात. सहकार्याची भावना वाढते. लोकांमध्ये एकोपा वाढतो.

**कार्यक्रम साजरे करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी.**

१. एकमेकांचा मान राखावा.

२. स्वच्छता राखावी.

३. ध्वनीवर्धकाचा आवाज हळू ठेवावा.

४. वृद्ध व लहान मुलांची काळजी घ्यावी.

५. शिस्त पाळावी.

६. कार्यक्रमामुळे वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. अन्न, पाणी, वीज यांचा प्रमाणात वापर करावा.

## माझी कृती

**१. शाळेतील शिस्तीच्या नियमांची यादी तयार कर.**

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

- शाळेत पाळावयाच्या शिस्तीच्या नियमांची यादी तयार करून घ्यावी.
- कार्यक्रम आनंदाने साजरा करत असताना इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे हे पटवून द्यावे.

अ. ध्ये. २

क्ष. २.१

अ. नि. ८




२. चित्राचे निरीक्षण कर व त्यातील योग्य व अयोग्य गोष्टींची यादी कर.

**योग्य गोष्टी :** ____________________

**अयोग्य गोष्टी :** ____________________

- यादी तपासून सकारात्मक वर्तनासाठी मार्गदर्शन करावे.

# १३ सार्वजनिक कामातील सहभाग

आपण अनेक सार्वजनिक सोईसुविधांचा वापर करत असतो. जसे- सार्वजनिक बाग, रस्ते, रेल्वे स्थानक, बस स्थानक, शाळा, रुग्णालये, स्वच्छतागृह इत्यादी. या सुविधांचा नीट वापर करणे आणि त्यांची स्वच्छता राखणे हे आपले कर्तव्य आहे.

**प्रसंग १ : सार्वजनिक बाग –**

(स्वरा व आर्यन घराशेजारील बागेत जातात. आर्यन रिकामे झालेले खाऊचे पाकीट जमिनीवर फेकतो.)

**स्वरा :** आर्यन हे पाकीट उचलून कचराकुंडीत टाक.

**आर्यन :** अगं ! ही बाग तर सार्वजनिक आहे. इथे कोणीही कचरा टाकला तर काय फरक पडतो ?

**स्वरा :** सार्वजनिक बाग म्हणजे आपल्या सर्वांचीच बाग. इथे कचरा न करणे व स्वच्छता राखणे हे आपले कर्तव्य आहे.

**आर्यन :** हो स्वरा, तू म्हणतेस ते अगदी बरोबर आहे. यापुढे मी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखून माझा सहभाग देईल.

**प्रसंग २ : बसमधील प्रवास.**

(मीना बसच्या सीटवर पेनने काहीतरी लिहीत आहे.)

**राजू :** मीना, थांब ! बसच्या सीटवर लिहिणे किंवा कोरणे चुकीचे आहे.

**मीना :** ही बस आपली स्वत:ची थोडीच आहे.

**राजू :** ही बस आपल्या सर्वांचीच आहे.

**वाहक :** अगदी बरोबर ! सार्वजनिक मालमत्तेची जपणूक म्हणजेच आपला सार्वजनिक कामातील मोठा सहभाग आहे.

- **क्षेत्रभेट :** बस स्थानक किंवा रेल्वे स्थानकावर क्षेत्रभेटीसाठी नेऊन स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.
- वरील संवादांचा अभिनय करून घ्यावा.

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ७

## माझी कृती



### १. दिलेल्या कृतींपैकी तू करत असलेल्या कृती समोर ✓ अशी खूण कर.

१. कचरा कचरापेटीत टाकणे. ☐

२. सार्वजनिक ठिकाणी शांतता राखणे. ☐

३. वाहतूक नियमांचे पालन करणे. ☐

४. बस/रेल्वे तिकिटासाठी रांगेत उभे राहणे. ☐

५. रुग्णवाहिकेचा आवाज ऐकल्यावर रस्ता मोकळा करणे. ☐

६. पायी चालताना फूटपाथचा वापर करणे. ☐

७. सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे. ☐

८. शाळेतील वस्तूंची काळजी घेणे. ☐

९. ग्रंथालयातील पुस्तके काळजीपूर्वक हाताळणे. ☐

१०. सार्वजनिक स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर स्वच्छता राखणे. ☐

- वरील कृतीद्वारे विद्यार्थी कशा प्रकारे सार्वजनिक कामात सहभागी होऊ शकतात याविषयी चर्चा करावी व सकारात्मक वर्तन समजावून सांगावे.
- पर्यटनस्थळी आपल्या सांस्कृतिक वारशांची जपणूक करण्याबाबत चर्चा करावी.

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ७

## २. दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर व त्यातील प्रसंगाचे तुझ्या शब्दांत वर्णन लिही.








अ. ध्ये. २

क्ष. २.१

अ. नि. ९

- समाजात / शाळेत वावरताना सकारात्मक वागणुकीच्या मुद्द्यांची नोंद करून घ्यावी.

# १४ समाज वर्तनाचे सकारात्मक नियम

समाजात वावरताना सर्वांचे जीवन सुसह्य आणि आनंदी होण्यासाठी पाळावयाचे नियम म्हणजे समाज वर्तनाचे नियम.

- **नियमांचे पालन केल्याने समाजात सुव्यवस्था रहाते व सर्वांचे जीवन सुकर होते.**

### नियमांचे महत्त्व

- समाजात शांतता टिकून रहाते.
- कोणावरही अन्याय होत नाही.
- सर्वांना प्रगतीची समान संधी मिळते.
- देशाचा सुजाण नागरिक म्हणून आपला विकास होतो.

चला ! समाजवर्तनाचे काही महत्त्वाचे सकारात्मक नियम समजून घेऊ.

१) **सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे :** शाळा, बाग, रस्ते, बस इत्यादी हे आपल्या सर्वांचे आहेत. त्यांची व त्यातील वस्तूंची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, विजेची बचत करणे, हे आपले कर्तव्य आहे.

२) **शिस्त व रांगेचे पालन करणे :** रांग पाळल्यामुळे गोंधळ होत नाही.

३) **पर्यावरणाचे रक्षण करणे :** झाडे लावणे व वाढवणे, झाडांची काळजी घेणे, पाणी बचत करणे, प्रदूषणाला आळा बसेल असे वर्तन करणे ही आपली जबाबदारी आहे.

४) **मदत करणे :** गरजू व्यक्तींना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.

५) **आदराने व आपुलकीने वागणे :** लहान-मोठे, अन्य भाषिक, इतर धर्मीय व दिव्यांग या सर्वांशी प्रेमाने, आदराने व आपुलकीने वागले पाहिजे.

६) **नियमांचे पालन करणे :** ठिकठिकाणी असणाऱ्या विविध नियमांचे प्रत्येकाने पालन करणे गरजेचे आहे.

७) **स्वच्छता राखणे :** समाजात वावरताना सगळीकडे स्वच्छता राखणे आवश्यक आहे.

### माझी कृती

**१. माहिती सांग.**

१) आज मी केलेले चांगले वर्तन.

२) तू कोणाला, काय व केव्हा मदत केली ?

**२. सकारात्मक व नकारात्मक वर्तनांची वहीत यादी कर.**

**३. समाज नियमांची घोषवाक्ये कार्डपेपरवर लिही व वर्गात लाव.**

अ. ध्ये. २
क्ष. २.१
अ. नि. ९

- सकारात्मक व नकारात्मक समाज वर्तनाची माहिती करून द्यावी.
- सकारात्मक समाज वर्तनाचे नियम विचारून चर्चा घडवून आणावी.

# १५ सामाजिक सुरक्षितता

समाज म्हणजे एकोप्याने एकत्र रहाणाऱ्या अनेक व्यक्ती किंवा कुटुंबाचा समूह. या समाजाला रस्ते, पाणी, वाहने, दवाखाने, शाळा अशा अनेक गोष्टी लागतात. या गोष्टींची सुरक्षितता व स्वच्छता ठेवून जोपासना करणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. यासाठी आपण सर्वांनी सामाजिक सुरक्षिततेचे नियम पाळून चांगला नागरिक बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## माझी कृती

**१. चित्रांचे निरीक्षण करून अयोग्य काय ते ओळखून योग्य काय आहे ते लिही.**















## २. पुढील कृती योग्य की अयोग्य हे त्या समोर लिही.

१) बसची सीट फाडणे. ____________

२) बागेत चालू असलेल्या नळाचे पाणी बंद करणे. ____________

३) रस्त्यावरील कचरा उचलून कुंडीत टाकणे. ____________

४) शाळेतील भिंतीवर, फळ्यावर तेलखडूने गिरगिटणे. ____________

५) खेळाच्या तासाला जाताना वर्गातील पंखे, दिवे बंद करणे. ____________

६) रेल्वेने जाताना तिकीट न काढता रेल्वेमध्ये चढणे. ____________

- समाज सुरक्षेच्या नियमांची चर्चा, गप्पागोष्टी कराव्या. नियम पाळण्यास सांगावे. दर आठवड्याला दोन सुरक्षादूत नेमून ते करत असलेल्या कामांची नोंद करावी.
- सुरक्षादूत म्हणून केलेल्या कामांचा अनुभव आठवड्याच्या शेवटी वर्गात सांगण्यास सांगावे.

अ. ध्ये. २
क्ष. २.१
अ. नि. १०

# १६ हस्तकौशल्य

हस्तकौशल्य म्हणजे हाताने उत्कृष्ट रीतीने विविध कामे करणे. उदा. चित्र काढून रंग भरणे, मातकाम, पाककला, कागदकाम, रंगकाम, शिवणकाम इत्यादी. याचप्रमाणे हस्तकौशल्यातून सुशोभनासाठी विविध वस्तू तयार करता येतात. आपण या कौशल्याचा वापर करून फ्रेम बनवूया.

## माझी कृती

### १. कागदापासून मासे

खालील साहित्य व साधनांचा वापर करून माशांची फ्रेम तयार कर.

**साहित्य व साधने :** रंगीत कागद, कात्री, डिंक, कार्डशीट, स्केचपेन  इत्यादी.









- कृति क्रमानुसार मासे तयार करून घ्यावेत व सजावट करून फ्रेम तयार करून घ्यावी.
- अशा माशांचा वापर करून भेट कार्ड, मत्सपेटी तयार करून घ्यावी.

अ. ध्ये. ४

क्ष. ४.१

अ. नि. २१.६

## पाककला

पाककला म्हणजे चविष्ट, रुचकर आणि पोषक खाद्य पदार्थ बनवण्याची कला. भारतात प्रत्येक प्रांतात विविध प्रकारचे खाद्यपदार्थ बनवले जातात.

पाककला केवळ पोट भरण्यासाठी नसून ती एक संस्कृती आहे. पाककला हा एक चांगला व्यवसाय आहे. आधुनिक काळात पाककला स्पर्धांमुळे हे कौशल्य विकसित करण्याची व नवनवीन पदार्थ शिकण्याची संधी मिळते.

### २. शेंगदाण्याच्या कुटाचा लाडू

खाली दिलेल्या साधन व साहित्यांचा वापर करून दिलेल्या चित्र क्रमाने कृती कर.

**साहित्य व साधने**

भाजलेले शेंगदाणे, चिरलेला गूळ, तूप, वेलदोडे पावडर, खलबत्ता, वाडगा, मोठा चमचा, ताट.



१. शेंगदाणे खलबत्त्यामध्ये कुटून घे.



२. शेंगदाण्याचा कूट, गूळ, तुप आणि वेलदोडे पावडर एकत्र कर.



३. एकत्र केलेल्या मिश्रणाचे वळून लाडू तयार कर.

- वरील कृतिक्रमाने लाडू तयार करून घ्यावे.
- तयार केलेले लाडू विद्यार्थ्यांना खाण्यास द्यावे. लाडूतील प्रत्येक घटकाचे पोषणमूल्य सांगावे.
- फ्रूट सॅलड, कोशिंबीर, सरबत अशासारख्या इंधन विरहीत पाककृती घरी तयार करण्यास सांगावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१

# १७ आपत्कालीन परिस्थिती

आपत्कालीन परिस्थिती म्हणजे अचानक, अनपेक्षित घडणारी परिस्थिती किंवा घटना. ही परिस्थिती किंवा घटना धोकादायक असते. या परिस्थितीत त्वरित उपाययोजना करणे गरजेचे असते. अशा घटना नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असतात. अशा काही आपत्कालीन परिस्थिती व त्या वेळी करावयाचे सकारात्मक वर्तन यांची माहिती घेऊ.

## माझी कृती

**१. चित्रातील आपत्कालीन परिस्थिती ओळखून त्याविषयी माहिती लिही व ती नैसर्गिक आहे की मानवनिर्मित ते लिही.**



______________________________

______________________________

______________________________



______________________________

______________________________

______________________________



______________________________

______________________________

______________________________

- आपत्कालीन परिस्थिती म्हणजे काय ते सांगून विविध नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितींची माहिती चर्चा/गप्पागोष्टी मधून द्यावी.
- अशा परिस्थितीत आपण कसे वागावे? काय काळजी घ्यावी याची माहिती द्यावी.

२. खाली आपत्कालीन परिस्थितीचे काही प्रसंग दिले आहेत. या प्रसंगी तू काय करशील ते लिही.

१) भूकंप झाला :

२) आग लागली :

३) अपघात झाला :

४) भिंत कोसळली :

५) पूर आला :

६) गर्दीत हरवलो :

आपत्कालीन परिस्थितीमध्ये इजा झाल्यास त्वरित उपचार करण्यासाठी काही साहित्य लागते. ते साहित्य एकत्र ठेवण्यासाठी जी पेटी असते त्यास 'प्रथमोपचार पेटी' म्हणतात.

### ३. माझी प्रथमोचार पेटी

- प्रथमोपचार पेटीत आवश्यक असणाऱ्या साहित्यांची यादी कर. पालकांच्या मदतीने प्रथमोपचार पेटी तयार कर.

### ४. प्रथमोपचार पेटीचे चित्र काढ.

### ५. आपत्कालीन परिस्थितीत आपल्याला मदत करणाऱ्या व्यक्तींची नावे व त्यांचे फोन नंबर लिही.

- नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्तीच्या परिस्थितीत आपले वर्तन कसे असावे याचा नाट्याभिनय करून घ्यावा.
- प्रथमोपचार पेटीतील साहित्यांची यादी तपासून उपयोगांबाबत चर्चा, गप्पागोष्टी कराव्या.
- आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्या व्यक्तींची मुलाखत घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.
- आपत्कालीन परिस्थितीमुळे मानसिक ताणाला सामोरे जावे लागल्यास 'मनोदर्पण व टेलिमानस' या हेल्पलाईन्स उपलब्ध आहेत याची माहिती द्यावी.

अ. ध्ये. २

क्ष. २.१

अ. नि. ११, १२

# १८ परिसर व व्यवसाय

आपल्याला लागणाऱ्या सर्व वस्तू आपण स्वतः तयार करू शकत नाही. त्या वस्तू आपल्याला खरेदी कराव्या लागतात. त्या वस्तू तयार करणारे व्यावसायिक असतात. म्हणजेच विविध व्यवसायांमुळे आपल्या गरजा पूर्ण होतात आणि लागणाऱ्या वस्तू सहज मिळू शकतात.

## माझी कृती

**१. आजूबाजूच्या परिसरात आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी अनेक व्यवसाय चालतात. अशा व्यवसायांची नावे लिही.**

१. ----------------------------------------------- ६. -----------------------------------------------

२. ----------------------------------------------- ७. -----------------------------------------------

३. ----------------------------------------------- ८. -----------------------------------------------

४. ----------------------------------------------- ९. -----------------------------------------------

५. ----------------------------------------------- १०. -----------------------------------------------

**२. वेगवेगळ्या व्यवसायांतून मिळणाऱ्या दहा वस्तूंची नावे लिही.**

१. ----------------------------------------------- ६. -----------------------------------------------

२. ----------------------------------------------- ७. -----------------------------------------------

३. ----------------------------------------------- ८. -----------------------------------------------

४. ----------------------------------------------- ९. -----------------------------------------------

५. ----------------------------------------------- १०. -----------------------------------------------

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १३, १६

- विविध व्यवसायांचे समाजाला होणारे उपयोग समजावून सांगावे.
- परिसरातील व्यवसायांची यादी तयार करून घेऊन वर्गात लावावी.

**३. शाळेत निमंत्रित केलेल्या व्यावसायिकाला प्रश्न विचार त्यांच्याशी चर्चा कर व त्यांच्या व्यवसायाची अधिक माहिती मिळव. ती माहिती स्वत:च्या शब्दांत लिही.**

**४. बागकामासाठी लागणाऱ्या साधनांची चित्रे काढ व प्रतिकृती तयार कर.**

- व्यवसाय करणाऱ्या काही पालकांना शाळेत निमंत्रित करून मुलांना त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

अ. ध्ये. ३

क्ष. १

अ. नि. १३, १६

## परिसरातील व्यवसायांचे वर्गीकरण

आपल्याला आपल्या परिसरात अनेक प्रकारचे व्यवसाय पाहायला मिळतात. यातील पारंपरिक व्यवसाय म्हणजे आपल्या पूर्वजांकडून चालत आलेले व्यवसाय. जे परंपरागत पद्धतीने केले जातात.

आधुनिक यंत्रे व साहित्यांचा वापर करून, जो व्यवसाय मोठ्या प्रमाणात, कमी वेळात, अधिक उत्पादनासाठी केला जातो त्याला 'आधुनिक व्यवसाय' म्हणतात.

### माझी कृती

**१. पुढे दिलेल्या व्यवसायांचे पारंपरिक व आधुनिक असे वर्गीकरण कर.**

१. गोठ्यात गुरे पाळणे.
२. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उंच इमारती बांधणे.
३. मोठ्या प्रमाणात दूध संकलन करणे.
४. विविध अन्नपदार्थ घरी तयार करुन विक्री करणे.
५. मागणीप्रमाणे अन्नपदार्थ यंत्राचा वापर करून मोठ्या प्रमाणावर तयार करणे.

| पारंपरिक व्यवसाय | आधुनिक व्यवसाय |
|---|---|
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |

**२. तुला माहीत असलेल्या पारंपरिक व आधुनिक व्यवसायांची यादी तयार कर.**

| अ.क्र | पारंपरिक व्यवसाय | आधुनिक व्यवसाय |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

३. एखाद्या आधुनिक व्यवसाय केंद्राला भेट दे. त्याची माहिती मिळव व ती तुझ्या शब्दांत लिही.

४. पारंपरिक व्यवसाय व आधुनिक व्यवसाय यांचे फायदे व तोटे लिही.

**फायदे :**

**तोटे :**

५. आधुनिक व पारंपरिक व्यावसायिकांची चित्रे जमवून वहीत चिकटव. चित्राखाली व्यवसाय आधुनिक की पारंपरिक ते लिही. चिकटवलेल्या व्यवसायांची नावे लिही.

- पारंपरिक व आधुनिक व्यवसाय म्हणजे काय हे समजावून सांगावे.
- त्यातील फरक स्पष्ट करावा.
- पारंपरिक व आधुनिक व्यवसाय केंद्राला भेट देण्याचे आयोजन करावे. (हा उपक्रम अनिवार्य आहे.)

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १४

# १९ हस्तकौशल्य

आपल्या सभोवताली काही व्यक्ती कागदापासून आकर्षक वस्तू तयार करण्याचा व्यवसाय करतात. उदा. आकाशकंदील, भेटकार्ड, कागदी फुले इत्यादी.

आपण हस्तकौशल्याचा वापर करून आकर्षक मोर तयार करू शकतो.

## माझी कृती

**१. खालील साहित्य व साधनांचा वापर करून मोर तयार कर.**

**साहित्य व साधने :** रंगीत कार्डशीट, कात्री, स्केचपेन, ग्लिटर पेन, डिंक किंवा ग्लू, पेन्सिल, आईस्क्रीम काड्या इत्यादी.




**तीन मोर एकाखाली एक जोडून भिंतीवर लावायचे सुशोभन तयार कर.**

- वरील कृतिक्रमानुसार मोर तयार करून घ्यावा.
- भिंतीवर लावण्याचे सुशोभन तयार करून घ्यावे.
- याप्रमाणे घडीकामातून विविध पक्षी, प्राणी तयार करून घ्यावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१.६

# २० परिसरातील व्यावसायिकांची माहिती

आपल्या परिसरात अनेक व्यक्ती विविध व्यवसाय करताना दिसतात. प्रत्येक व्यवसाय करत असताना इतर व्यावसायिकांच्या मदतीची आवश्यकता असते.

खालील चित्रात एका मोठ्या इमारतीचे बांधकाम सुरू असलेले दिसते. ही इमारत बांधण्यासाठी कोणाची मदत लागते ते सांग.


अभियंता (इंजिनिअर)


वास्तुशिल्पकार
(आर्किटेक्ट)


बांधकाम कामगार


वकील




लाद्या बसवणारा


मोठी यंत्रे चालवणारा


नळ जोडणी करणारा


लाकूड काम करणारा

## माझी कृती

**१. वरील चित्रामध्ये आणखी कोणाची चित्रे हवी आहेत याची यादी कर.**

---

---

- इमारत बांधताना मदत करणाऱ्या व्यक्ती व त्यांची कामे याबाबत चर्चा/गप्पागोष्टी कराव्या.
- चित्रातील व्यक्तींव्यतिरिक्त मदत करणाऱ्या आणखी व्यक्तींचे नावे व कामे विचारावी.

## २. कोणते काम कोण करतो. जोड्या लाव.

| कामाचे स्वरूप | उत्तरे | कोणाचे काम |
|---|---|---|
| १. फर्निचर बनवणे, दारे खिडक्या बनवणे. | | आर्किटेक्ट |
| २. इमारतीचा नकाशा तयार करणे. | | वकील |
| ३. नळांची(पाईपची) जोडणी करणे. | | इंजिनिअर |
| ४. बांधकामाला आवश्यक कागदपत्रांची छाननी, पडताळणी करणे. | | लाकूड काम करणारा |
| ५. बांधकाम नकाशाप्रमाणे व्यवस्थित होते, योग्य साहित्य, योग्य प्रमाणात वापरले जाते हे पाहणे. | | प्लंबर |

## ३. तुला माहीत असलेल्या इतर व्यवसायांची नावे लिही.

## ४. तुला आवडलेल्या व्यवसायाची माहिती लिही.

- चित्रांच्या मदतीने विविध व्यावसायिकांची माहिती करून द्यावी, त्यांची कामे समजावून द्यावी.
- विविध व्यावसायिकांच्या वेशभूषेचे सादरीकरण करून घ्यावे.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १५

# २१ पानाफुलांचे तोरण

आपल्या देशात विविध सण, समारंभ, उत्सव साजरे केले जातात. यासाठी फुलांचे सुशोभन केले जाते. पानाफुलांपासून आकर्षक सजावटीच्या वस्तू तयार करण्याचा व्यवसाय काही व्यक्ती करतात.

पानाफुलांचा वापर करून आपणही अशी आकर्षक सजावटी करू शकतो.

## माझी कृती

खाली दिलेल्या साहित्यसाधनांचा वापर करून दिलेल्या क्रमानुसार पानाफुलांचे तोरण तयार कर.

**साहित्य व साधने :** कात्री, दोरा, चिकटपट्टी, आंब्याच्या झाडाची पाने, शेवंती, जास्वंद, कण्हेर, चाफा इत्यादी फुले, इत्यादी.









- कृतिक्रमानुसार तोरण तयार करून घ्यावे.
- आणखी वेगवेगळ्या पद्धतीने पानाफुलांची तोरणे तयार करता येतात हे सांगून वेगवेगळ्या प्रकारची तोरणे तयार करून घ्यावीत.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१

# २२ शेतीपूरक व्यवसाय

आपला देश शेतीप्रधान देश आहे. आपल्या देशात लोक शेतीतून वेगवेगळ्या प्रकारची उत्पादने घेतात.

शेतीला जोड म्हणून तसेच उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी केला जाणारा व्यवसाय म्हणजे 'शेतीपूरक व्यवसाय'. या व्यवसायामुळे शेतकऱ्याला आर्थिक आधार मिळतो.

## शेतीपूरक व्यवसाय :



१) कुक्कुट पालन २) दुग्ध व्यवसाय ३) मशरुम उत्पादन

## कुक्कुट पालन

अंडी व मांस मिळवण्यासाठी कोंबड्या पाळण्याच्या व्यवसायाला 'कुक्कुट पालन' म्हणतात.

**व्यवसायासाठी आवश्यक गोष्टी :**

१) उत्तम जातीची कोंबडीची पिल्ले. २) पौष्टिक खाद्य. ३) निवारा ४) पाणी
५) लसीकरण ६) योग्य निगा

**व्यवसायाचे फायदे :**

१) आपल्याला पौष्टिक आहार म्हणून अंडी व मांस मिळते.
२) विष्ठेपासून सेंद्रिय खत मिळते.
३) पिसांपासून शोभेच्या वस्तू बनवतात. या सर्वांमुळे रोजगार निर्मिती होते.

## दुग्ध व्यवसाय

गाय, म्हैस, शेळी इत्यादी पशुंपासून दूध उत्पादन व त्याची विक्री करून अर्थार्जन करणे.

**व्यवसायासाठी आवश्यक गोष्टी :**

१) चांगल्या जातींच्या गायी, म्हशी, शेळ्या.
२) स्वच्छ, हवेशीर, सुरक्षित गोठा किंवा निवारा.
३) हिरवा चारा, सुका चारा, संतुलित आहार, स्वच्छ पिण्याचे पाणी.
४) नियमित लसीकरण व पशुवैद्यकीय सेवा.

**व्यवसायाचे फायदे :**

१) पौष्टिक आहार म्हणून दूध मिळते.
२) दुधापासून दही, लोणी, तूप इत्यादी पदार्थ तयार करता येतात.
३) विष्ठेपासून सेंद्रीय खत तयार होते.
४) दूध विक्रीमुळे उत्पन्न मिळते व रोजगार निर्मिती होते.

## मशरुम (अळंबी) व्यवसाय

मशरुम (अळंबी) उत्पादन व्यवसाय म्हणजे मशरुम (अळंबी) उगवून त्याची विक्री करणे.

**व्यवसायासाठी आवश्यक गोष्टी :**

१) मशरुम (अळंबी) उगवण्यासाठी लागणारे विशेष बियाणे.
२) स्वच्छ, थंड व अंधारी जागा.
३) सोयाबीन, तांदूळ, गहू यांचा भुसा.
४) ओलावा ठेवण्यासाठी पाणी.
५) मशरुम (अळंबी) वाढवण्यासाठी पिशव्या.
६) स्वच्छता.

**व्यवसायाचे फायदे :**

१) कमी जागेत करता येतो.
२) कमी खर्चात करता येतो.
३) लवकर उत्पादन मिळते.
४) चांगला नफा मिळतो.
५) मशरुम (अळंबी) पौष्टिक अन्न आहे.



कुक्कुट पालन व्यवसाय

दुग्ध व्यवसाय





मशरुम (अळंबी) व्यवसाय

# २३ आधुनिक व्यवसाय

काळानुसार आपले राहणीमान बदलले आहे. आपल्या गरजाही बदलल्या आहेत. या गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिक व्यवसाय सुरू झाले आहेत. या व्यवसायांमध्ये तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण युक्त्यांचा वापर करून ग्राहकांच्या गरजा पूर्ण केल्या जातात. व्यवसायांमध्ये नैतिकतेचे पालन करणे आवश्यक आहे.

उदाहरणादाखल खाली काही व्यवसाय दिले आहेत. त्याबद्दल अधिक माहिती मिळव व लिही.

१) **डिजीटल व आय टी सेवा :** संगणक, मोबाइल, इंटरनेट वापरून लोकांना मदत करणाऱ्या सेवा.

२) **ई कॉमर्स :** ऑनलाईन म्हणजे इंटरनेटवर वस्तू खरेदी व विक्री करणे.

३) **डिलिव्हरी आधारीत स्वयंपाक घर (क्लाउड किचन) :** खाद्य पदार्थ तयार करून ग्राहकांच्या मागणीनुसार खाद्यपदार्थ घरी पोहोचवले जातात.

४) **इव्हेंट मॅनेजमेंट व प्लॅनिंग :** लग्न, वाढदिवस इत्यादी कार्यक्रमांत सुशोभन करून आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा पुरवठा करणे.

५) **सौंदर्य व आरोग्य सेवा :** शरीर सुंदर आणि निरोगी दिसण्यासाठी व ठेवण्यासाठी पुरवण्यात येणारी सेवा.

## माझी कृती

**१. तुला माहीत असलेल्या आणखी काही आधुनिक व्यवसायांची माहिती मिळव व लिही.**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**२. तुला माहीत असलेल्या आधुनिक व्यवसायांची चित्रे जमवून वहीत चिकटव व त्या खाली व्यवसायाचे नाव लिही.**

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १६

• वेगवेगळ्या आधुनिक व्यवसायांविषयी चर्चा/गप्पा गोष्टी करून माहिती द्यावी.

# २४ करू मैत्री संगणकाशी

आजच्या युगात संगणक आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. शाळा, कार्यालये, दवाखाने अशा अनेक व्यवसायांमध्ये संगणकाचा वापर केला जातो. यामुळे संगणकाची वैशिष्ट्ये व उपयोग याबद्दल माहीत असणे आवश्यक आहे. इयत्ता तिसरीमध्ये आपण संगणकाच्या भागांची माहिती घेतली आहे. या इयत्तेत आपण संगणकाची वैशिष्ट्ये, उपयोग व त्यांचा वापर कोणत्या क्षेत्रांत केला जातो याबाबत माहिती घेणार आहोत.

## माझी कृती

**१. खाली दिलेल्या चौकोनांमध्ये संगणकाच्या भागांची नावे लिही.**



### संगणकाची वैशिष्ट्ये :

१) **माहित मिळवणे व जतन करणे :** संगणकाच्या मदतीने आंतरजालावरून (इंटरनेट) विविध विषयांची माहिती मिळवता येते. मिळवलेली माहिती संगणकात साठवून पुन्हा वापरता येते.

२) **शैक्षणिक खेळ :** संगणकावर उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक खेळांच्या माध्यमातून मजेत शिकता येते.

३) **प्रकल्प तयार करणे :** विविध प्रकल्प तयार करण्यासाठी, सादरीकरणासाठी संगणकाची मदत होते.

४) **चित्र काढणे :** संगणकावर उपलब्ध प्रोग्रॅमच्या सहाय्याने चित्र व नक्षी तयार करता येते.

५) **गणिती काम करणे :** बेरीज, वजाबाकी व इतर गणिती क्रिया करणे संगणकामुळे सोपे होते.

६) **लेखन करणे :** निबंध, पत्र, तक्ते यांसारख्या घटकांचे लेखन करता येते.

## २. या शिवाय संगणकाच्या इतर उपयोगांची माहिती मिळव व लिही.

संगणकाच्या वैशिष्ट्यांमुळे त्याचा उपयोग खालील क्षेत्रांमध्ये केला जातो.

| | | |
|---|---|---|
| १) कार्यालये | ६) बँकिंग | ११) मनोरंजन |
| २) जाहिराती | ७) वाहतूक | १२) विज्ञान व तंत्रज्ञान |
| ३) छपाई | ८) पोस्ट व दूरध्वनी | १३) प्रशिक्षण |
| ४) वैद्यकीय क्षेत्र | ९) वैयक्तिक वापर | १४) कृषिक्षेत्र |
| ५) शिक्षण क्षेत्र | १०) क्रीडा क्षेत्र | १५) दळणवळण |

### तांत्रिक साधने

संगणकाप्रमाणे विविध तांत्रिक साधनांचा उपयोग केला जातो. उदा. झेरॉक्स मशीन,मोबाइल इत्यादी.

## ३. खाली काही तांत्रिक साधनांची चित्रे दिली आहेत. त्यांचे उपयोग स्वत:च्या शब्दांत लिही.



**१. मोबाईल :**



**२. स्मार्ट वॉच –**



३. गणक यंत्र (कॅलक्युलेटर) –



४. टेलिव्हिजन –



५. झेरॉक्स मशीन –



६. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा –

- आधुनिक व्यवसायांमध्ये संगणकाचा वापर कशा प्रकारे केला जातो हे सांगावे.
- संगणकाच्या वैशिष्ट्यांबाबत चर्चा/गप्पागोष्टी कराव्या.
- बँकेत आणि रेल्वेचे तिकिट रिझर्व्हेशन करण्यासाठी संगणकाचा वापर कसा केला जातो हे सांगावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २३

# २५ खरेदी–विक्री

## माझी कृती

### १. सरबत

खालील साहित्य व साधनांचा वापर करून सरबत तयार कर.

**साहित्य व साधने :** लिंबे १५, साखर १ किलो, मीठ ५० ग्रॅम, पाणी (अंदाजे ३५ ग्लास), आवश्यकतेनुसार वेलदोड्यांची पूड.



**कृती :**

१) लिंबे धुऊन अर्धी–अर्धी चिरून घे.

२) पातेल्यात लिंबू पिळण्याच्या यंत्रांने रस काढून घे.

३) साखर, मीठ घाल.

४) पाणी घालून डावाने साखर विरघळेपर्यंत हलवून घे.

५) वेलदोडे पूड घाल.

६) ग्लासमध्ये ओतून पिण्यास दे.

### खरेदी–विक्री संवाद प्रक्रिया

**शिक्षिका :** मुलांनो, आज आपण कोणता पदार्थ बनवला ?

**विद्यार्थी :** सरबत.

**शिक्षिका :** बरोबर ! पण कोणते सरबत बनवले ?

**विद्यार्थी :** लिंबाचे सरबत.

**शिक्षिका :** आपण आता लिंबूसरबत बनवण्याची व त्याच्या खरेदी–विक्रीचे प्रक्रिया समजून घेऊया.

**विद्यार्थी :** हो.

**शिक्षिका :** यासाठी आपल्याला कोणकोणते साहित्य लागले ?

**विद्यार्थी :** लिंबू, पाणी.

**शिक्षिका :** आणखी.

**विद्यार्थी १ :** साखर लागली बाई.

**विद्यार्थी २ :** आणि मीठसुद्‌धा.

**विद्यार्थी ३ :** आपण वेलदोड्याची पूडसुद्‌धा घातली ना बाई म्हणजे वेलदोडेही लागले.

**शिक्षिका :** शाब्बास मुलांनो, आता सांगा या वस्तू आपण कुठून आणल्या.

**विद्यार्थी २ :** बाई घरून.

**शिक्षिका :** पण आईने त्या दुकानातून आणल्या ना ? पैसे देऊन ?

**विद्यार्थी २ :** हो बाई. दुकानदाराने पैसे घेऊन मगच वस्तू दिल्या.

**शिक्षिका :** म्हणजे आपण दुकानदाराकडून वस्तू खरेदी केल्यानंतर त्या आणून त्यावर प्रक्रिया केली. कोणती प्रक्रिया केली कोण सांगेल?

**विद्यार्थिनी :** लिंबं धुतली, चिरली, त्याचा रस काढला. त्यात साखर, मीठ आणि पाणी घातले.

**विद्यार्थी :** आणि त्यात वेलदोड्याची पूडही घातली आणि लिंबाचा रस काढण्याच्या यंत्राने रस काढल्यामुळे बियाही पडल्या नाहीत.

**शिक्षिका :** बरोबर ! ही झाली आपली प्रक्रिया– सरबत तयार करण्याची.

आता आपण त्यासाठी किती खर्च आला हे पाहू या का?

**विद्यार्थिनी :** हो बाई.

| वस्तू | किंमत |
|---|---|
| ३ रु. ला १ लिंबू, म्हणून १५ लिंबाचे | ४५ रु. |
| १ किलो साखर | ५० रु. |
| ५० ग्रॅम मीठ | १ रु. |
| पाणी | २० रु. |
| वेलदोडे (वेलची) | १० रु. |

म्हणजे आपल्याला आलेला एकूण खर्च = ४५+५०+१+२०+१०= १२६ रु.

**सर्व विद्यार्थी :** आपल्याला सरबत बनवायला १२६ रु. खर्च आला.

**शिक्षिका :** बरोबर, पण त्यात आपली मेहनत, भांडी यांचीही काही किंमत लावावी लागेल.

**विद्यार्थी :** बरोबर मग आपण १४ रु. लावूया का? बाई म्हणजे पूर्ण रक्कम येईल.

**शिक्षिका :** हो चालेल म्हणजे १२६+१४= १४० रु. खर्च झाला आणि त्यात किती ग्लास सरबत तयार झाले?

**विद्यार्थिनी :** ३५ ग्लास झाले बाई.

**विद्यार्थी :** म्हणजे ३५ ग्लाससाठी १४० रु. खर्च आला.

**शिक्षिका :** म्हणून एका ग्लाससाठी किती खर्च ते कसे काढाल?

**विद्यार्थी :** बाई १४० ला ३५ ने भागून.

**विद्यार्थी २ :** म्हणजे १४०/३५= ४ रु. बाई एका ग्लासाला ४ रु. खर्च आला.

**शिक्षिका :** म्हणजे आपण किती रुपयाला १ ग्लास सरबत विकायला हवे म्हणजे आपल्याला फायदा होईल?

**विद्यार्थी :** ४ रु. ला बाई.

**शिक्षिका :** बघा हं !

**विद्यार्थिनी :** नाही बाई, ५ रु. ला एक ग्लास, कारण आपल्याला फायदाही व्हायला हवा आहे.

**शिक्षिका :** शाब्बास, १ ग्लास ५ रु. ला म्हणजे ३५ ग्लासचे १७५ रु. जमा होतील. म्हणजे आपली खरेदीची रक्कम १२६ रु. व मेहनत व इतर खर्च १४ रु. आणि एकूण १४० रु.

३५ ग्लास सरबत विक्री करून आलेली विक्री रक्कम १७५ रु. म्हणजे आपल्याला १७५ वजा १४० म्हणजे ३५ रु. फायदा म्हणजे नफा झाला.

ही आहे आपली खरेदी व विक्रीची संपूर्ण साखळी. अशा तऱ्हेने तुम्ही कोणताही व्यवसाय करताना खरेदी प्रक्रिया करतानाचा खर्च यावरून विक्रीची किंमत काढू शकता.

**विद्यार्थी :** हो बाई ! आता आम्हांला व्यवसायातील खरेदी-विक्री कशी करतात हे समजले.

## आईस्क्रीमच्या काड्यांपासून भिंतीवरील सुशोभन

तुला खरेदी-विक्री प्रक्रिया समजली आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी खालील कृती कर.

**२. खालील दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून क्रमानुसार कृती कर व भिंतीवरील सुशोभन तयार कर.**

**साहित्य :** १०-१५ आईस्क्रीम स्टिक्स, जाड दोरी, मणी, टिकल्या, छोट्या काचा, छोटी घंटा, रंग, ब्रश.

**कृती:-**

१) आईस्क्रीम काड्या घे.
२) काड्यांना तुझा आवडता रंग दे.
३) काड्या आकृतीत दाखवल्याप्रमाणे चिकटव व २ चौरस तयार कर.
४) जाड दोरीला रंग दे व दोन चौकोन एका खाली एक चिकटव.
५) दोरीच्या खालच्या टोकांना घंटा आणि मणी बांध.
६) भिंतीवर हुकाला अडकवण्यासाठी दोरीच्या वरच्या भागात गोलाकार कडी तयार कर.
७) चौकोनांवर मणी, टिकल्या, काचा चिकटवून सुशोभन कर.

**तुझे 'वॉल हँगिंग' तयार झाले.**

- विद्यार्थ्यांना सरबत तयार करण्याचे साहित्य आणायला सांगून सरबत बनवण्याची कृती करून घ्यावी.
- खरेदी-विक्री प्रक्रियेबाबत माहिती द्यावी.


























आईस्क्रीमच्या काड्यांपासून सुशोभन

# २६ संभाषण कौशल्य

दैनंदिन जीवनात आपण सतत इतरांशी संवाद साधत असतो. परंतु या संवादातून आपल्या भावना, विचार स्पष्टपणे दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी योग्य संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे.



## माझी कृती

खाली दिलेल्या संवादाचे वाचन करून शिक्षकांच्या मदतीने नाट्यीकरण कर.

**नेहा :** अरे वा ! आंबा दादा, किती छान दिसतोस तू ! तुझ्या सावलीत किती गार गार वाटते.

**आंब्याचे झाड :** नेहा, ये बस माझ्या सावलीत ! खूप दिवस झाले तू इथं आली नाहीस.

**नेहा :** हो, शाळा आणि अभ्यासामुळे वेळच मिळाला नाही. पण उन्हाळा आला की तुझी आठवण येते.

**आंब्याचे झाड :** (हसून) हो का ? माझ्या गोड आंब्याची आठवण येते की सावलीची ?

**नेहा :** दोन्हींची ! तुझी चवदार फळे आणि त्यापासून तयार झालेले खाद्यपदार्थ मला खूप आवडतात.

**आंब्याचे झाड :** मलासुद्‌धा आनंद होतो. जेव्हा मुले माझ्या सावलीत खेळतात आणि पक्षी घरटी बांधतात.

**नेहा :** आंबा दादा, तू खूप उपयुक्त आहेस, तू फळे तर देतोस पण त्या फळांचे बरेचसे खाद्यपदार्थही माझी ताई करते.

**आंब्याचे झाड :** हो, पण माणसे आता आम्हांला तोडत आहेत. मला काळजी वाटते की पुढे काय होईल ?

**नेहा :** आंबा दादा ! तू काळजी करू नकोस. मी अजून झाडे लावेन आणि तुलासुद्‌धा जपेन. माझ्या शाळेतील मित्रमैत्रिणींना पण झाडे लावण्यास सांगेन. तू माझा सर्वांत चांगला मित्र आहेस.

**आंब्याचे झाड :** मला तुझ्याकडून हीच अपेक्षा आहे. झाडे वाचली तरच पृथ्वी वाचेल ! (नेहा आंब्याच्या झाडाला मिठी मारते आणि दोघेही आनंदी होतात.)



- वरील संवादाचे नाट्यीकरण करुन घ्यावे.
- इतर विषयांवर संवाद तयार करून त्या संवादांचे सादरीकरण करून घ्यावे. उदा. विक्रेता आणि ग्राहक, दाताचे डॉक्टर आणि पेशंट, बस वाहक आणि प्रवासी.

विनामूल्य वितरणासाठी

# २७ हस्तकौशल्य

नक्षीकाम ही एक आपली पारंपरिक कला आहे. यामध्ये आपण कापडावर विविध प्रकारचे आकर्षक नमुने तयार करू शकतो. ही नक्षी सुई दोऱ्याच्या मदतीने कापडावर करतात. त्याला ‘भरतकाम’ म्हणतात.

आपला रुमाल आकर्षक व सुंदर दिसण्यासाठी रुमालावरही नक्षीकाम करता येते.

## माझी कृती

### १. रुमालावर नक्षी.

**खालील साहित्य व साधने वापरून शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार टाक्यांचे प्रकार कर.**

**साहित्य व साधने :** सुती रुमाल, विविध रंगांचे रेशमी धागे, सुई, कात्री, पेन्सिल, भरतकामाची रिंग.

**टाक्यांचे प्रकार :**

१) धावदोरा : 

२) टीप : 

३) हेम : 

४) साखळी : 



### २. भरतकाम करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घे व त्याची नोंद वहीत कर.

- टाक्यांचे प्रकार समजावून टाके घालून घ्यावे.

## ३. मातीपासून कासवाची प्रतिकृती

काही व्यक्ती मातीपासून सुबक व सुंदर वस्तू बनवून विकण्याचा व्यवसाय करतात. आपणही मातीपासून सुरेख वस्तू बनवू शकतो.

**खालील साहित्य व साधने वापरून क्रमानुसार कृती कर.**

**साहित्य व साधने :** माती, पाणी, भांडे, रंगकामाचा सपाट ब्रश, टोकदार काडी, कापड.






- कृतिक्रमानुसार कासव तयार करून घ्यावे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार मातकामाच्या विविध वस्तू तयार करण्यास सांगावे.
- तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करून पालकांना आमंत्रित करावे.
- मातकाम करणाऱ्या कारागिराच्या कामाच्या ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करावी. (हा उपक्रम अनिवार्य आहे)

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१.९

## ४. वर्तमानपत्रापासून कागदी पिशवी

प्लॅस्टिकच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होते. प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी कागदी पिशव्यांचा वापर केला जातो. अनेक जण वर्तमानपत्रांपासून पिशव्या तयार करण्याचा व्यवसाय करतात. आपणही वर्तमानपत्रापासून पिशव्या करू शकतो.

**खालील साहित्य व साधने वापरून कृति क्रमानुसार पिशवी तयार कर.**

**साहित्य व साधने :** जुनी वर्तमानपत्रे, पंचिग मशिन, जाड दोरा, डिंक, इत्यादी.



- वरील क्रमानुसार कृती करून घेऊन विद्यार्थ्यांकडून वर्तमानपत्र अथवा रंगीत कागदाच्या पिशव्या बनवून घ्याव्या.
- तयार केलेल्या पिशव्या शिक्षकांना भेट देण्यास सांगावे.

## ५. भेटकार्ड

**साहित्य व साधने –** विविध रंगांची फुले, पाने, गवत, काड्या, डिंक, स्केचपेन, कात्री, कार्डशीट इत्यादी.

**कृती –**

१. विविध रंगांची लहान मोठी फुले, पाने, गवत, काड्या, जमव.

२. वर्तमान पत्रांच्या घड्यांमध्ये ही पाने, फुले, गवत, काड्या ठेव.

३. दोन पाट घेऊन त्यामध्ये किंवा पलंग व गादीमध्ये वर्तमान पत्राच्या पाने, फुले असलेल्या घड्या ८/१० दिवस ठेव म्हणजे पाने, फुले, गवत पूर्ण वाळेल.

**या पद्धतीने तयार झालेल्या वनस्पतींच्या सुकलेल्या नमुन्यांना 'हर्बेरिअम' म्हणतात. त्यांचा उपयोग वनस्पतीशास्त्रात अभ्यासासाठी होतो.**

४. भेटकार्डासाठी एक योग्य आकाराचा घडी करता येईल असा रंगीत कार्डशीट घे. त्याला योग्य आकार दे.

५. कार्डशीटच्या कडेने रंगीत स्केचपेनने किनार आख.

६. किनारीच्या आत पाने, फुले, गवताची छान रचना करून घे व त्या ठिकाणी पाने, फुले, गवत चिटकव.

७. गरज पडल्यास स्केचपेनने सजावट कर.

८. आत योग्य संदेश लिही.









## ६. कागदाचे पाकीट तयार करणे

पोस्टाने राखी, चिट्‌ठी पाठविण्यासाठी, अर्ज देताना, महत्वाची कागदपत्रे/पैसे देण्यासाठी आपल्याला कागदी पाकीट लागते.

वेगवेगळ्या मापाचे कागद घेऊन पाकीटे तयार करता येतात.

**साहित्य व साधने :** २० सेमी x २१ सेमी आकाराचा एक कागद, पट्‌टी, पेन्सिल, कात्री, डिंक, स्केचपेन इ.

**कृती –**

१. २० सेमी x २१ सेमी आकाराचा एक कागद घे. तो आडवा धर.
२. पट्‌टीने मोजून १ सेमी अंतरावर रेघ मार.
३. १ सेमी आखलेला भाग सोडून उरलेल्या कागदाचे दोन समान भाग कर.
४. मधोमध घडी घाल.
५. घडी उलगड. कडेच्या भागावर वरच्या बाजूला २ सेमी वर आडवी रेघ मार. व हा भाग काप.
६. याच भागावर खालील बाजूला १ सेमी वर आडवी रेघ मार व काप. दुसरा भाग मोठा दिसेल.
७. परत दोन्ही घड्या घाल व १ सेमी चा भाग दुसऱ्या भागावर चिकटव.
८. खालील बाजूचा १ सेमीचा भाग वरच्या बाजूला चिकटव.
९. वरच्या बाजूचा २ सेमी चा भाग घडी घाल. पाकीट तयार झाले.


















## ७. भिंगरी

**साहित्य व साधने –** पुठ्ठा किंवा जाड पांढरा कार्डशीट, टूथपिक, एक सेमी रुंद व दोन इंच लांब कागदाच्या दोन पट्ट्या, जलरंग किंवा स्केचपेन, कात्री, ब्रश, डिंक इत्यादी.

**कृती –**

१. कार्डशीटवर दोन सेमी त्रिज्येचे वर्तुळ काढून कापून घे.

२. या वर्तुळाचे आठ सारखे भाग करून घे.

३. प्रत्येकी एका भागाला लाल, पिवळा, हिरवा, निळा, नारंगी, आकाशी, जांभळा असे वेगवेगळे रंग दे.

४. तयार झालेल्या चकतीला कर्कटकने मधोमध छिद्र पाड.

५. या छिद्रातून रंग वरच्या बाजूला येतील अशी टूथपिक अडकव. टूथपिकची टोकाची बाजू उंचीला कमी ठेव.

६. टूथपिकच्या चकतीवरील व खालील बाजूस कागदाची पट्टी गुंडाळून चिकटव.

७. भिंगरीला गिरकी दिल्यावर ती फिरताना सर्व रंग एकमेकांत मिसळून चकतीवर पांढरा रंग दिसेल. यावरून पांढऱ्या रंगात सर्व रंग मिसळलेले असतात हे समजते.
चकतीवर रंगांऐवजी काळ्या स्केचपेनने वेगवेगळे आकार काढून भिंगरी फिरताना दिसणाऱ्या आकृत्यांची मजा पहा.





















## ८. बांबूच्या काड्यांपासून भौमितिक आकार तयार करणे

**साहित्य व साधने –** बांबूच्या लहान मोठ्या काड्या, डिंक इत्यादी.

**कृती –**

१. बांबूच्या लहान मोठ्या काड्या घे.

२. काड्या एकमेकांना चिकटवून त्रिकोण, चौकोन, आयत, चौरस, पंचकोन, षट्कोन इत्यादी आकार तयार कर.

३. या आकारांचा एकत्रित वापर करून सौंदर्याकृती बनव.









## ९. काथ्याचे उपयोग

काथ्यापासून तयार केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंचा आपण वापर करतो. अशा कोणकोणत्या वस्तू दिलेल्या चित्रात दिसत आहेत ते शोध व त्यांचे उपयोग लिही.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| **वस्तू** | | | | |
| **उपयोग** | | | | |

### टाचण्या अडकवण्याची डबी

**साहित्य व साधने –** खराब झालेला काथ्या, प्लॅस्टिकची डबी, रंगीत कापड, डिंक, सुई दोरा इत्यादी.

**कृती –**



१. डबीत बसेल एवढा काथ्या घेऊन, हाताने घट्ट दाबून चेंडू बनवणे. मधे मधे डिंकाने चिकटव.

२. चेंडूवर रंगीत कापड गुंडाळ व घट्ट बांधून किंवा शिवून घे.

३. बांधलेली किंवा शिवलेली बाजू डबीला आतील बाजूस डिंक लावून चिकटव.

४. डबीला टिकल्या, लेस लावून सुशोभित कर.

५. टाचण्या खोचून ठेवण्यासाठी याचा वापर कर.

## १०. उडणारा किडा

**साहित्य व साधने –** २० सेमी X ३ सेमी आकाराची कार्डशीटची पट्टी, लाल व पिवळे कागदाचे तुकडे, काळे स्केच पेन, डिंक, कात्री इत्यादी.

**कृती –**

१. २० सेमी X 3 सेमी आकाराची पट्टी घेऊन मधोमध दुमड.

२. दुमडलेल्या बाजूवर आकृतीत दाखविल्याप्रमाणे घडी घाल व उघड.

३. तयार झालेला त्रिकोण आतील बाजूस दुमडून घे. पट्टीची वरची बाजू खाली कर.

४. लाल कागदाचे एक वर्तुळ काप व मधोमध त्याचे दोन तुकडे कर. हे तुकडे आकृतीत दाखवल्याप्रमाणे चिकटव.

५. पिवळ्या रंगांच्या कागदाचे दोन पाकळीच्या आकाराचे तुकडे कापून लाल तुकड्यांखाली चिकटव..

६. कार्डशीटवर राहील एवढा पिवळ्या रंगांच्या कार्डशीटचा शरीराच्या आकाराचा तुकडा कापून लाल व पिवळ्या तुकड्यांच्या मधोमध चिकटव किंवा तेथे पिवळा रंग दे.

७. लाल अर्धवर्तुळांवर काळ्या स्केचपेनने ठिपके दे.

८. लाल अर्धवतुळांवरील बाजूस कार्डशीटवर डोके, डोळे व स्पृशा काढ.

दोन्ही हातांनी कार्डशीट ओढून बंद केल्यावर लाल किडा उडताना वाटेल.
















६


७


८


९


१०


११


१२


१३

## ११. काडेपेटीची आगगाडी

**साहित्य व साधने –** पाच रिकाम्या काडेपेट्या, बटणे, पांढरा कागद, डिंक.

**कृती –**

१. काडेपेट्या व त्याच्या आतील खोका वेगळे करून घे. वरच्या पाचही भागांना पांढरा कागद चिकटवून घे.

२. आकृतीत दाखवल्याप्रमाणे काडेपेट्यांची रचना कर.

३. खोक्यांच्या खालील बाजूस बटणे चिकटव.

४. आगगाडीचा पुढचा भाग बनविण्यासाठी कागदाची ४ सेमी रुंदीची पट्टी घेऊन गुंडाळी करून आडव्या भागावर चिकटव. या गुंडाळीवर एक सेमी व अर्धा सेमी पट्टीच्या दोन गुंडाळ्या उभ्या चिकटव.

५. मागील बाजूस बाहेरील एक भाग व आतील एक भाग आकृतीत दाखवल्याप्रमाणे चिकटव. सर्व भाग एकत्र जोडून आगगाडी तयार कर.















# मला आवडलेला व्यवसाय

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कार्यशिक्षण इयत्ता चौथी (मराठी माध्यम)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

(विनामूल्य वितरणासाठी)

